शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १५१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# समाजहीत जपणारा; दूरदृष्टी नेतृत्व राज्याने गमावले

## अजितदादा पवार यांना सर्व पक्षीय शोकसभेत आदरांजली






**जालना । प्रतिनिधी -** शिस्तप्रिय व रोखठोक बोलणारा तसेच समाजहित जपणारा नेता म्हणून ओळख असलेले अजितदादा पवार यांच्या सारखे दूरदृष्टी नेतृत्व महाराष्ट्राने गमावले असल्याची भावना गुरुवार ( दि. २९) सर्व पक्षीय नेतेमंडळींनी व्यक्त केली.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनानिमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेसच्या सभागृहात आयोजित सर्व पक्षीय शोकसभेच्या अध्यक्षस्थानी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे हे होते. यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे, माजी आमदार कैलास गोरंट्याल, माजी आमदार व राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण, भाजपचे जिल्हा महानगराध्यक्ष भास्कर दानवे, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख भास्कर अंबेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शेख. महेमूद , राजेश राऊत , रिपाइं नेते ॲड. ब्रम्हानंद चव्हाण, कामगार नेते अण्णा सावंत, काँग्रेसचे राजेंद्र राख, कल्याण दळे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डेव्हिड घुमारे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, रशीद पहेलवान आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे म्हणाले की, अजितदादा पवार हे कठोर परिश्रम करणारे नेते होते, आज राजकारणात कठोर परिश्रम करणारे नेते राहिले नाहीत, स्पष्टवक्तेपणा व शिस्त बाळगणारे नेते म्हणून अजितदादा पवार यांची ओळख होती, १९९०-९५ दरम्यान विधीमंडळात आपला त्यांच्याशी संपर्क आला, दूरदृष्टी नेतृत्व म्हणून अजितदादा पवार यांची ओळख राहील, त्यांच्या अनेक आठवणी आपल्या सदैव स्मरणात राहील, असे सांगत अजितदादा पवार यांच्या काही आठवणी त्यांनी नमूद केल्या.

यावेळी बोलतांना आमदार अर्जुन खोतकर म्हणाले की, अजितदादा पवार आणि आपला ३५ वर्षांचा संबंध होता, अजितदादा पवार यांच्या सारखा प्रशासकीय यंत्रणेवर कमांड ठेवणारा दुसरा नेता आपण बघितला नाही, थोरल्या पवार साहेबांचे संस्कार घडल्याने ते शिस्तप्रिय नेते म्हणून ओळखले गेले, वक्तशीरपणा, विकासाचा दृष्टीकोन, पक्ष नेतृत्वाला सभागृहात जाब विचारणारा नेता म्हणून अजितदादा पवार हे ओळखले गेले, त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्राची मोठी हानी झाली असून नवीन पिढीला त्यांचे विचार हे प्रेरणादायी ठरतील, असे आमदार खोतकर म्हणाले.

सर्व राजकीय नेते मंडळींना हवे हवेसे वाटणारे नेतृत्व म्हणून अजितदादा पवार यांची ओळख होती, सर्व समाजाविषयी नितांत प्रेम असणारे नेते म्हणून ओळखले जाणारे अजितदादा पवार हे विधीमंडळाचे कामकाज सहजपणे हाताळत असे, महाराष्ट्र एका अष्टपैलू व्यक्तिमत्त्वास पोरका झाला असल्याची भावना आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी व्यक्त केली.

आमदार नारायण कुचे यावेळी बोलतांना म्हणाले की, सत्ता असो वा नसो अजितदादा पवार यांनी स्पष्टवक्तेपणा व शिस्त कायम ठेवली, त्यांचे कार्य हे प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलतांना कैलास गोरंट्याल म्हणाले की, अजितदादा पवार यांनी जालना शहराच्या पाणी प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले, जालना शहरातील क्रीडा संकुलासाठी वाढीव निधी उपलब्ध करून दिला अजितदादा पवार हे जालनेकरांच्या सदैव आठवणीत राहावे, यासाठी जालना शहरातील महत्त्वाच्या चौकास, रस्त्यास महानगर पालिकेने त्यांचे नाव द्यावे, अशी सूचनाही गोरंट्याल यांनी यावेळी केली.

यावेळी बोलतांना भास्कर अंबेकर म्हणाले की, जालना शहरातील पाणी पुरवठा योजनेचा प्रश्न अजितदादा पवार यांनी सोडविण्यासाठी पुढाकार घेतला. शहराच्या विकास प्रश्नांवर त्यांचे लक्ष राहिले, त्यांच्या निधनामुळे एक कर्तबगार नेतृत्व हरपले असल्याची भावनाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी आपली भावना व्यक्त करतांना अरविंद चव्हाण म्हणाले की, अजितदादा पवार यांच्या अकाली निधनामुळे एक झंझावात नेतृत्व शांत झाले आहे, आपल्या राजकीय जडणघडणीत मोलाचा वाटा आहे, अजितदादा पवार यांच्यामुळेच आपण घडलो,आपल्याला सर्वोच्च स्थानावर बसविण्यात दादांचा मोठा वाटा आहे. सदैव सकारात्मक दृष्टीकोन ठेवून काम करणारे अजितदादा पवार यांनी जालना जिल्ह्यातील विकास प्रश्नांवर लक्ष केंद्रित करून जिल्ह्याच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला. बंद पडलेला जालना साखर कारखाना सुरू करण्यासाठी अजितदादा पवार यांनी महत्त्वाची भूमिका घेत ३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. सकारात्मक दृष्टीकोन ठेवून कामे करणारे नेतृत्व आपल्यातून निघून गेले असले तरी अजितदादा पवार यांच्या अनेक आठवणी जालनेकरांच्या सदैव स्मरणात राहतील, असे ते म्हणाले.

अजितदादा पवार हे विकासाचा दृष्टीकोन ठेवणारे कर्तबगार नेते होते, उपेक्षित समाज घटकांच्या विकासाचा विचार करणारे रोखठोक नेतृत्व हरपले असल्याची भावना यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डेव्हिड घुमारे यांनी व्यक्त केली. अजितदादा पवार यांच्या निधनामुळे बहुजनांचे मोठे नुकसान झाले असून फुले-शाहू-आंबेडकर चळवळीला बळ देण्याची भूमिका अजितदादा पवार यांनी सातत्याने घेतली असल्याची भावना यावेळी ॲड. ब्रम्हानंद चव्हाण यांनी व्यक्त केली. स्पष्टवक्तेपणा व स्वच्छतेची आवड असणारे नेते म्हणून अजितदादा पवार यांची ओळख कायम राहील, अशी भावना यावेळी भास्कर दानवे यांनी व्यक्त केली. कामगारांचे प्रश्न सोडवण्याचा शब्द देवून तो पाळणारा नेता म्हणून अजितदादा पवार यांची ख्याती होती, विकासाचा दृष्टीकोन ठेवून काम करणारा नेता हरपला असल्याची भावना अण्णा सावंत यांनी यावेळी व्यक्त केली. कार्यकर्त्यांना न्याय देणारा नेता म्हणून अजितदादा पवार यांची ओळख होती, त्यांच्या निधनामुळे कार्यकर्त्यांचे मोठे नुकसान झाले असल्याची भावना राजेंद्र राख यांनी व्यक्त केली.

यावेळी मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा शहराध्यक्ष राजेंद्र जाधव, व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विनित सहानी यांनीही आपल्या भावना व्यक्त करून अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी अण्णासाहेब चित्तेकर, अन्वर मिर्झा, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष नंदकिशोर जांगडे, आतिकखान, श्रीमती शंकुतला कदम, , मंगल ताई पाटील , रिकंल तायड , बदर चाऊस, शितल ताई बारोटे , सगीर अहेमद, नितीन जेथलिया,सुनील आर्दड , राम सावंत, शाह आलमखान,राजेंद्र गोरे, बाला परदेशी, संजय दाड , प्रा. सोपानराव तेलगड , साईनाथ चिन्नादौरे , विरेंद्र धोका, वसंत जाधव , संजय इंगळे , शरद देशमुख , सिद्धीविनायक मुळे, संतोष ढेंगळे , कृष्णा पडुळ , अविनाश कव्हळे , प्रभाकर घेवंदे , सतीश वाहुळे , कैलास मगरे , महेंद्र रत्नपारखे , महेश निकम, जीवन सले, शिवराज जाधव, संजय देठे,जावेद अली, नारायण वाडेकर , झहिर बिल्डर , इमरान बिल्डर , यांच्यासह सर्व पक्षीय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. सपाटे यांनी केले.

### दिव्यांग व्यक्तींच्या विविध मागण्याबाबत बैठक संपन्न

# दिव्यांगाचे सक्षमीकरण करण्यासाठी सदैव प्रयत्नशील - जिल्हाधिकारी मित्तल

## दिव्यांगाचे बोगस प्रमाणपत्र बाळगणाऱ्या व्यक्तीवर होणार कारवाई



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील बोगस प्रमाणपत्र दिव्यांग असलेल्या व्यक्तीची नावे प्रशासनास कळवा, त्याची पडताळणी करून बोगस प्रमाणपत्र बाळगणाऱ्या व्यक्तीवर कारवाई केली जाईल. तरी जिल्ह्यातील दिव्यांगाचे सक्षमीकरण करण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील आहोत, अशी निःसंदिग्ध ग्वाही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी दिली

जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात दिव्यांग व्यक्तीच्या विविध मागण्याविषयी बैठक घेण्यात आली. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.प्रताप पाटील, दिव्यांग संघटनेचे रविंद्र अंभोरे, द्वारकाबाई गाडे, अशोक बरकासे, राहुल मुळे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, आपल्या निदर्शनास आलेल्या बोगस प्रमाणपत्र प्रकरणी अर्ज करा आम्ही त्याची पडताळणी करू असे सांगून सामान्य रुग्णालय परिसरात साइन लैंग्वेज केंद्र निर्मित केले जात आहे. त्याचा फायदाही आगामी काळात दिव्यांग व्यक्तींना होणार आहे. जालना जिल्ह्यात लवकरच ज्या दिव्यांग बांधवांना कृत्रिम अवयवाची गरज असेल त्यांना जयपूर फ ुटकडून निःशुल्क अवयव उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यासाठी जिल्ह्यात शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिराची माहिती आपल्या गरजू व्यक्तीपर्यंत पोहचवा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी दिव्यांग व्यक्तीच्या कल्याणकारी योजनेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. दिव्यांगांच्या बोगस प्रमाणपत्रांवर आळा घालावा अशी विनंती दिव्यांग संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने यावेळी केली.

बैठकीत शासन नियमानुसार आमदार-खासदार निधी दिव्यांगासाठी नियमीतपणे दरवर्षी खर्च करावा. शासन निर्णयानुसार दिव्यांगासाठी असलेल्या पालकमंत्री, जिल्हाधिकारी व आमदार यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या जिल्हा व तालुका समित्या तात्काळ स्थापन करणे. सर्व दिव्यांगाना एक समान २५००/- मासिक पेन्शन लागू करून शासन निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करणे. जिल्हा नियोजन निधीतील १% रक्कम दिव्यांग विकासासाठी काटेकोरपणे वापरणे. भुमीहिन बेघर दिव्यांगांना १ गुंठा सरकारी जागा राहण्यासाठी देणे. शासन अधिनियम-२०१६ प्रमाणे शासकीय कार्यालय परिसरामध्ये दिव्यांग व्यक्तींना २०० चौ. फुट जागा मिळणे. दिव्यांग व्यक्तीचे बीज भांडवलाचे प्रस्ताव बँका मंजुर करत नसल्याबाबत. बोगस कार्ड तयार करुन बोगस दिव्यांग बसने प्रवास करत असल्याबाबत.

ग्रामपंचायतीमार्फत दिव्यांगाना मिळणारा ५% निधी वाटप होत नसलेबाबत, जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये दिव्यांग पान २ वर

# लोकसहभागातून राजेवाडी शाळेच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील-जगत घुगे

## वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने ग्रामस्थ मंत्रमुग्ध



**जालना । प्रतिनिधी -** राजेवाडी (ता. बदनापुर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांचा कौतुक सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. लोकसहभागातून राजेवाडी शाळेचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आम्ही सदैव प्रयत्नशील आहोत, असा विश्वास मुख्याध्यापक जगत घुगे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

प्रजासत्ताकदिनी पार पडलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. शालेय समितीचे अध्यक्ष रणजीत शेजुळ यांच्या हस्ते ध्वजारोहणानंतर मुख्य सांस्कृतिक सोहळ्याला प्रारंभ झाला. व्यासपीठावर सरपंच कमलाबाई गुसिंगे, गौरवसिंग गुसिंगे, माजी पंचायत समिती सदस्य प्रतापसिंह गुसिंगे , शालेय समितीचे अध्यक्ष रणजीत शेजुळ, उपाध्यक्ष प्रतापसिंह डेहंगळ, दावलवाडीचे सरपंच साईनाथ जाधव, ग्रामसेविका श्रीमती मेहेत्रे, मुख्याध्यापक जगत घुगे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी शालेय स्वच्छता, अभ्यासातील प्रगती, शिस्त या या आधारावर प्रत्येक वर्गातील एक मुलगा आणि एक मुलगी अशा दोघांना बेस्ट ऑफ स्टुडन्ट पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याशिवाय आतापर्यंत पार पडलेल्या विविध स्पर्धा आणि प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित स्पर्धेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना कै. श्रीराम घुगे प्रतिष्ठानच्यावतीने मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमात पान २ वर

संपादकीय पान

# धडाडीचा लोकनेता... प्रशासनातील ‘दादा’

बुधवार २८ जानेवारीची सकाळ महाराष्ट्रासाठी सकाळ न ठरता काळ रात्र ठरली कारण या सकाळी महाराष्ट्राच्या राजकारणातील धडाडीचा लोकनेता उपमुख्यमंत्री अजित पवार काळाच्या पडद्याआड गेले. बुधवारी सकाळी ९ वाजता टीव्हीवर बातम्या पाहत असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला अपघात ही ब्रेकिंग न्यूज ऐकली आणि काळजाचा ठोका चुकला. अजित पवार हे या अपघातातून सहिसलामत वाचावेत अशी प्रार्थना करत असतानाच अजित पवारांच्या निधनाची बातमी टीव्हीवर झळकली आणि मन सुन्न झाले. या बातमीने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली ही बातमी खोटी निघावी अशी अनेकजण प्रार्थना करत होते पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. दादा आपल्यात नव्हते. क्षणात होत्याचे नव्हते झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला. कार्यकर्ते, नेते, तरुण, वृद्ध, महिला सगळ्यांच्याच अश्रुंचा बांध फुटला. दादा म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक वादळ होते. चार दशकांहून अधिक काळ आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्राच्या राजकारणावर ठसा उमटवणारा हा वाघ नागरिकांना कायमचा सोडून जरी गेला असला तरी आपल्या कार्याने त्यांनी नागरिकांच्या मनावर जो ठसा उमटवला तो कधीही निघून जाणार नाही. दादा म्हणजे कामाचा माणूस. दादाकडे गेले की काम होणारच असा विश्वास लोकांना असायचा. काम होण्यायोग्य असेल तर लगेच करणारा आणि होण्यायोग्य नसेल तर तोंडावर नाही म्हणणारा. पोटात एक आणि ओठात एक असे राजकारणी दादा नव्हते जे पोटात आहे तेच बोलणारा आणि तेच करणारा. कडक शिस्तीचा पण तितकाच दिलदार मनाचा. मिश्किल, सुस्वभावी मनात येईल ते पटकन बोलून टाकणारा. बोलताना कशाचीही तमा न बाळगणारा पण आपण बोलल्याने कोणाचे मन दुखावले गेले हे लक्षात येताच जाहीर दिलगिरी व्यक्त करणारा आणि त्यासाठी जाहीर प्रायश्चित घेणारा, स्वतः वेळेचे बंधन पाळणारा आणि इतरांना वेळेचे महत्व पटवून देणारा. तरुणांना निर्व्यवसनी राहण्याचा सल्ला देणारा, चुकीला चूक आणि बरोबर असेल तर बरोबर म्हणणारा, कार्यकर्ता असो की नेता, स्वपक्षातील असो की विरोधातील चुकीचे वागत असेल तर त्याला वडिलकीच्या नात्याने खडसावणारा आणि त्याच नात्याने त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा, सतत सत्तेत राहूनही विरोधी पक्षांशी मैत्रीचे संबंध जपणारा, सकाळी सहा वाजता कामाला सुरुवात करणारा आणि ते काम दर्जेदार व्हावे असा हट्ट धरणारा, केवळ आणि केवळ महाराष्ट्राचा विकास हेच डोक्यात असणारा आणि त्यासाठी दिवसाचा रात्र करणारा, भाजप, शिवसेनेसारख्या हिंदुत्ववादी पक्षाशी हातमिळवणी करून सत्ता स्थापन करणारा तरीही शिव, ,शाहू, फुले आंबेडकरांचा पुरोगामी विचार न सोडणारा, त्या विचारांशीच एकनिष्ठ राहणारा, कुटुंब आणि राजकारण यांची योग्य सांगड घालणारा, कुटुंबात राजकारण आणि राजकारणात कुटुंब येऊ न देणारा दादा म्हणजे राजकारणातील वेगळेच रसायन होते. प्रत्येक गाव खेड्यातील कार्यकर्त्याला दादा म्हणजे आपला नेता वाटत होता. जवळपास चार दशकांहून अधिक काळ महाराष्ट्राच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी राहिलेल्या दादांच्या राजकीय जीवनाची सुरुवात १९८१- ८२ साली छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे संचालक म्हणून झाली. भारतीय राजकारणातले द्रष्टे नेते काका शरद पवार यांनी त्यांच्यातील नेतृत्व गुण हेरून त्यांना राजकारणात आणले. १९९१ साली आपल्या नेतृत्व गुणाची चुणूक दाखवून दादांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सत्तांतर घडवून आणले. त्याच वर्षी सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यावर देखील आपले वर्चस्व मिळवले. दादांच्या नेतृत्व गुणाची पारख झाल्याने १९९१ साली शरद पवारांनी दादांना थेट खासदारकीची संधी दिली. खासदार म्हणून मोठ्या मताधिक्याने जिंकून आलेल्या दादांनी काकांसाठीच खासदारकीचा राजीनामा देऊन बारामतीत आमदारकी लढवली तेव्हापासून कामाच्या आणि लोकसंपर्का च्या जोरावर दादा बारामती तालुक्यातून सलग आठ वेळा विक्रमी मतांनी आमदार म्हणून निवडून आले. १९९१ साली पहिल्यांदाच आमदार झालेल्या दादांना सुधाकरराव नाईक यांनी आपल्या मंत्रिमंडळात घेतले आणि कृषी, फलोत्पादन आणि ऊर्जा खात्याचे राज्यमंत्रीपद दिले. १९९९ नंतर त्यांनी ग्रामविकास, पाणीपुरवठा, स्वच्छता ही मंत्रिपदे सांभाळी. जलसंपदा हे खातेही २०१० पर्यंत त्यांच्याकडेच होते. अर्थमंत्री म्हणून तर त्यांनी विक्रम केला. महाराष्ट्राचे अर्थमंत्रिपद त्यांनी सर्वाधिक काळ भूषवले. दादांनी सहा वेळा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्याचा विक्रम केला. सहा वेळा उपमुख्यमंत्रीपद भूषवणारे दादा हे एकमेव राजकीय नेते असतील. दरम्यानच्या काळात त्यांच्या गळ्यात विरोधी पक्षनेत्याची माळही पडली. १९९९ साली शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केल्यावर राष्ट्रवादी पक्ष आणि घड्याळ चिन्ह घरोघरी पोहचवण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. शरद पवार दिल्लीचे राजकारण करत असल्याने महाराष्ट्रातील राष्ट्रवादीची धुरा त्यांच्याच खांद्यावर होती. त्यांच्यामुळेच राष्ट्रवादी काँग्रेसला कायम सत्तेत राहता आले. दादांची जशी राजकारणार पकड होती तशीच पकड त्यांची कला, क्रीडा, साहित्य, सहकार, शिक्षण, जलसिंचन या क्षेत्रावर देखील होती. प्रत्येक क्षेत्राचा बारकाईने अभ्यास करून त्यात सर्वोत्तम देणारा अजित पवारांसारखा दुसरा नेता नाही. त्यांचा इतका कामाचा झपाटा असणारा नेता पुन्हा होणार नाही. अजित पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राची कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे. त्यांचा सारखा नेता पुन्हा होणार नाही. त्यांच्या निधनाने राजकारणातील दादा पर्व संपले असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. धडाडीचे लोकनेते असणारे सर्वांचे लाडके अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# गरीब असो वा श्रीमंत मृत्यू हा येणारच...

पृथ्वीतलावर माणूस सगळ्याच गोष्टींचे योग्य पद्धतीने नियोजन लावू शकतो. प्रत्येक गोष्टीची अभ्यासपूर्ण विल्हेवाट लावू शकतो. परंतु मृत्यूचे नियोजन आणि विल्हेवाट लावणारा प्राणी अजून तरी या पृथ्वीतलावर जन्माला आला नाही. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज आयुष्यभर नियोजन लावून लढाया लढत राहिले. शिवाजी महाराजांनी प्रत्येक लढाई लढण्याआधी किंवा एखादी गोष्ट करण्याआधी त्या गोष्टीचे अगोदर परिपूर्ण नियोजन लावून नंतरच त्या गोष्टीला सामोरे जाण्याची तयारी ठेवायचे. छत्रपती शिवाजी महाराजांना फक्त आणि फक्त त्यांच्या मृत्यूचेच नियोजन लावता आले नाही. गरीब असो किंवा श्रीमंत असो प्रत्येक व्यक्तीला मृत्यू हा येणारच असतो. काही व्यक्तींना मृत्यू हा जरा लवकर येतो तर काही व्यक्तींना मृत्यू हा दीर्घकाळानंतर येतो. परंतु मृत्यू कदापी येणार नाही, असा प्राणी या पृथ्वीतलावर अजून तरी जन्माला आला नाही. माणसाला मिळालेले जीवन हे क्षणभंगुर आणि पाण्यावरचा बुडबुडा आहे. तो बुडबडा कधी फुटेल आणि माणूस जीवनातून कधी उठेल याचा काही नियम ठरलेला नसतो. एखादा माणूस खूप श्रीमंत आहे, म्हणून त्याला मृत्यू नाही आणि एखादा माणूस गरीब आहे म्हणून त्याला मृत्यू आहे, असे कधी होते का? मित्रहो तुमच्याकडे भरपूर संपत्ती असेल, आलिशान गाडी व आलिशान बंगला असेल, तुम्ही मोठ्या पदावर उच्चपदस्थ अधिकारी आहात, तुमच्याकडे कोणत्याच सुख सुविधा कमी नाहीत, म्हणून तुम्हाला कधी मृत्यू येणार नाही, असे होणार नाही. मृत्यू रोखण्यासाठी ना पैसा कामाला येतो, ना कोणता माणूस कामाला येतो. ज्याचे जीवन त्याच्या नशिबात जेवढे आहे, तेवढेच त्याला जगता येईल. कोणताच माणूस नियतीच्या पुढे जाऊ शकत नाही. कोणताच माणूस मृत्यूवर विजय मिळवू शकत नाही. मेल्यानंतर प्रत्येकाला स्मशान भूमीतच एकाच ठिकाणी जाळले जाते अथवा जमिनीत पुरले जाते. एकदा मेलेला माणूस कितीही पैसा फेकला अथवा पैशाने कितीही मोठा व श्रेष्ठ असला तरी त्याला मृत्यूला चुकवता येणार नाही. मृत्यू पुढे सगळीच माणसे शेवटी झुकत असतात. प्रत्येक गोष्टीला कोणता ना कोणता तरी पर्याय हा असतोच. परंतु मृत्यूला या जगात कोणताच पर्याय नाही. एकदा माणूस मेला म्हणजे त्याचे जीवन कायमचे संपले म्हणून समजा. कोणत्याही गोष्टीचा नाद करा परंतु मृत्यूचा नाद कधीच करू नका. मृत्यू पुढे कोणाचेच काहीही चालत नाही. फक्त जीवन जगताना असे जगा की, आपण मेल्यानंतर देखील आपल्या कार्याचा गौरव झाला पाहिजे. आपण मेल्यानंतर प्रत्येकाच्या डोळ्यातून पाण्याचे थेंब आले पाहिजेत. अंत्यविधीला येणारा प्रत्येक माणूस हळहळला पाहिजे. त्याला आपल्या मृत्यूचे अतीव दुःख झाले पाहिजे. आणि तो स्मशानभूमीत ढसाढसा रडला पाहिजे. तरच आपण जीवन चांगल्या प्रकारे जगू शकलो असे म्हणता येईल. माणसाला जीवनात कधीच कोणत्याच गोष्टीचा गर्व नसला पाहिजे. ज्याला पैशाचा गर्व आहे, ज्याला गाडी व बंगल्याचा गर्व आहे, ज्याला भरपूर संपत्तीचा गर्व आहे, त्या माणसाने एकदा तरी स्मशानभूमीत जाऊन एक पाच मिनिट विचार करून बघितला तर आपल्या लक्षात येईल इथे आपल्यापेक्षा कित्येक महान व्यक्ती मातीत जमा झाले आहेत. गरीब असो वा श्रीमंत प्रत्येकाला शेवटी स्मशानभूमी हेच घर असणार आहे. म्हणून माणसाने जीवनात आल्यावर आपले व आपल्या आईवडिलांचे नाव कमावले पाहिजे. आई-वडिलांना, बहिण भावांना आणि मित्रांना व नातेवाईकांना खूप खूप जीव लावला पाहिजे. आई वडिलांना वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवण्यापेक्षा त्यांना मरेपर्यंत आपल्या सानिध्यात जगू द्या. आई-वडिलांचा आशीर्वाद घेतल्याने तुमच्या जीवनात आनंदाचे क्षण आल्याशिवाय राहणार नाहीत. गावात हिंडताना, समाजात व पंचक्रोशीत वावरताना प्रत्येकाला आदराने बोलावे, प्रत्येकाशी एकजुटीने राहून एकमेकांच्या सुखदुः खात व एकमेकांच्या संकटात वायू वेगाने धावून जावे. कोणत्याच गोष्टीचा घमेंड व श्रीमंतीचा तोरा मिरवण्यापेक्षा गोरगरीब व तळागाळातील लोकांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडवण्यासाठी आपण आपले जीवन व्यतीत केले पाहिजे. आपण मेल्यानंतर देखील आपले नाव लोकांनी आदराने काढावे असे आपल्याला वाटत असेल तर त्यासाठी अगोदर आपल्याला माणूस बनून माणसासारखे वागावे लागेल. माणसासारखा व्यवहार करून माणुसकीची शोभा वाढवावी लागेल. आपल्या देशात अनेक महापुरुष होऊन गेले. त्यांनी आपले संपूर्ण जीवन गोरगरीब व तळागाळातील लोकांच्या भल्यासाठी व कल्याणासाठी अर्पित केले आहे. शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत त्यांनी अन्यायाविरुद्ध व येथील वर्णवादी व्यवस्थेविरुद्ध लढा देऊन गोरगरीब दीनदलित, शोषित, पीडित, वंचित व तळागाळातील लोकांना न्याय देण्यासाठी त्यांनी आपली पूर्ण हयात खर्ची घातली आहे. म्हणून ह्या महापुरुषांना आज मरून बरीच वर्षे लोटली आहेत, तरी सुद्धा या महापुरुषांच्या नावाचा कीर्ती डंका आजही चहूमूलकी वाजत आहे. म्हणून मरावे परी कीर्ती रुपी उरावे या म्हणीप्रमाणे आपण मेल्यानंतर देखील लोकांनी आपल्या कार्याचा व आपल्या नावाचा कीर्ती डंका वाजवला पाहिजे. नुकतीच उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची विमान अपघातात मृत्यू झाल्याची बातमी सर्वत्र वाऱ्यासारखी पसरली. अजित दादा पवार हे नाव राजकीय क्षेत्रात अतिशय प्रभावी व दमदार होते. राजकीय क्षेत्रातील पावरफुल व्यक्तिमत्व आज महाराष्ट्राला सोडून महाराष्ट्र पोरका करून गेले आहे. अजित दादांकडे त्यांच्या शंभर पिढ्या बसून खातील एवढा पैसा होता. परंतु अजित दादाला मृत्यू पुढे पैसा कामाला आला ना माणसे कामाला आली. अमाप व गडगंज संपत्तीचे मालक असणारे अजित दादा पवार या जगातून कायमचे मालवले. गरीब असो वा श्रीमंत प्रत्येकाला मृत्यू हा अटळ आहे. एखाद्याकडे भरपूर पैसा आहे म्हणून त्याला खूप आयुष्य लाभेल असे नाही. आणि एखाद्याकडे पैसा नाही म्हणून तो अल्प काळ जगेल असेही नाही. म्हणून माणसाने जीवन जगताना सगळ्यांशी प्रेमाने व आपुलकीने राहून आपले जीवन आनंदाने जगत रहावे. गोरगरीब व सामान्य जनतेच्या कल्याणासाठी व उन्नतीसाठी महापुरुषांनी आपले सारे आयुष्य झिजवले आहे. म्हणून मेल्यावर देखील प्रत्येकाच्या ओठावर त्या महापुरुषांचे नाव सदैव गाजत राहते. शांतीचे प्रतीक तथागत गौतम बुद्ध, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे या महापुरुषांनी आपले संपूर्ण जीवन वंचितांसाठी व दलितांसाठी खर्ची घातले, म्हणून आज देखील या महापुरुषांचे नाव संपूर्ण जगाच्या ओठावर कायम गाजत राहते. करोडपती असो वा कोट्याधीश असो, गरीब असो वा भिकारी असो प्रत्येकाला रिकाम्या हाताने यावे लागते आणि रिकाम्या हातानेच जावे लागते, शेवटी प्रत्येकाचे घर म्हणजे सार्वजनिक स्मशानभूमी आहे, त्या स्मशानभूमीत वेगवेगळ्या नमुन्याची माणसे मरून राख झालेली आपल्याला दिसतील. म्हणून श्रीमंतीत माजू नका आणि गरिबीत लाजू नका. मानवी जीवन क्षणभंगुर आहे.. गरीब असो वा श्रीमंत प्रत्येकाला शेवटी सगळे इथेच सोडून जावे लागणार.. मृत्यू मात्र प्रत्येकाच्या पाचवीला पुजलेला आहे... एवढी नेहमी ध्यानात ठेवा...

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# स्वीकृत नगरसेवक पद सामाजिक पातळीवर काम करणाऱ्यांना देण्यात यावे

आदरणीय, श्री देवेन्द्रजी फडणवीस साहेब, मुख्यमंत्री( महाराष्ट्र राज्य ) आपणास या निवेदनाद्वारे विनंती करण्यात येते की,मागील अनेक वर्षापासून स्वीकृत सदस्य म्हणून त्या-त्या पक्षातील राजकीय लोकांना विशेष स्थान दिल्या जाते.परंतु बदलत्या काळानुसार स्वीकृत सदस्य पदाचे निकष बदलविने गरजेचे आहे.सन्माननीय मुख्यमंत्री महोदय, संपूर्ण महाराष्ट्रात भाजपा सोबतच महायुतीला महानगरपालिका निवडणुकीमध्ये भरघोस यश प्राप्त झाले आणि २९ पैकी २५ मनपामध्ये जनतेचा कौल महायुतीकडे आला व महायुतीची सत्ता आली आहे याबद्दल आपले,भाजपाचे व महायुतीचे हार्दिक अभिनंदन.या सर्वच महापालिकेमध्ये १५ नगरसेवकांच्या मागे १ नगरसेवक अशा पध्दतीने स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती होणार आहे याचेही मनापासून स्वागत.स्वीकृत नगरसेवक निवडण्याचा अधिकार त्यांच्या संख्याबळाप्रमाणे प्रत्येक राजकीय पक्षांना आहे. आतापर्यंत स्वीकृत नगरसेवक हा राजकीय पातळीवरील असायचा.परंतु सरकारने स्वीकृत नगरसेवक पदाचे निकष बदलवून राजकीय पातळीवर न देता सामाजिक पातळीवर द्यायला हवे असे मला वाटते.प्रत्येक महानगरपालिकेच्या अंतर्गत सामाजिक कार्यशैलीला कुठेतरी मानाचे स्थान असणे गरजेचे आहे. सामाजिक कार्य करणारे निष्ठावंत,विचारवंत व समाजासाठी झटणारे वेगवेगळ्या क्षेत्रातील समाजसेवक सुद्धा असतात आणि आहेत त्यांचे कार्य अफाट असते परंतु दिसत नाही,ही बाब सरकारने व राजकीय पक्षांनी लक्षात घेतली पाहिजे.सोबतच प्रत्येक पक्षांच्या राजकीय पुढाऱ्यांनी सुद्धा लक्षात ठेवली पाहिजे.यात प्रामुख्याने पत्रकार, लेखक, साहित्यिक, स्वतंत्र पत्रकार, विचारवंत,पर्यावरण प्रेमी,निवृत्त अग्निशमन अधिकारी, सैन्यदलातील निवृत्त अधिकारी, निसर्ग प्रेमी इत्यादी अशा अनेक प्रकारच्या सतत सामाजिक कार्यासाठी झटणाऱ्यांना स्वीकृत सदस्यपदी स्थान मिळायला हवे. कारण राजकारणाच्या ठिकाणी राजकारण ठीक आहे. परंतु सामाजिक कार्याला नवी चालना देण्याच्या उद्देशाने सरकारने व पक्ष-विपक्षांनी अशा पध्दतीचे पाऊल उचलले पाहिजे. कारण स्वीकृत सदस्य हा पर्याय सरकार जवळ असल्याने याला राजकारणात गुरफटने योग्य नाही. यावर सरकारने, सन्माननीय राज्यपाल,सन्माननीय मुख्यमंत्री, सन्माननीय उपमुख्यमंत्री यांनी गांभीर्याने विचार करून सामाजिक कार्याला नवीन दिशा देण्याच्या उद्देशाने पाऊल उचलणे गरजेचे आहे.आज पत्रकार, लेखक आपल्या लेखणीच्या माध्यमातून गल्लीपासून तर आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंतची माहिती प्रत्येकांच्या घरोघरी पोहचविण्याचे कार्य करीत असतो. अशांना सरकारने स्वीकृत नगरसेवकांची जबाबदारी दिली तर सामाजिक कार्याला मोठी मदत होईल. राजकीय पुढारी हा आपल्या पद्धतीने कार्य करेलच यात दुमत नाही.परंतु सामाजिक क्षेत्रातील समाजसेवक हे आपले कार्य आगळ्यावेगळ्या पद्धतीने करून नवीन विकासाचे पाऊल उभे करू शकते व नवीन ऊर्जा निर्माण करू शकते. कारण सामाजिक कार्याची जाणीव व दांडगा अनुभव यांना पुर्वीपासूनच असतो फक्त साथ हवी सरकारची,राजकीय पक्षांची व पुढाऱ्यांची.त्यामुळे सरकारने राजकीय ताळमेळासोबतच सामाजिक कार्याची बांधिलकी जपणाऱ्यांना जर सरकारने स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्ती केली तर शहराच्या विकास आणखी भरभराटीला येईल.सरकारला व सन्माननीय मुख्यमंत्री यांना माझी नम्र विनंती आहे की स्वीकृत नगरसेवकांच्या बाबतीत गांभीर्याने विचार करायला हवा.कारण राज्यातील महापालिकांमध्ये जर सामाजिक कार्यातील व्यक्ती सहभागी झाली तर राज्यातील चित्र आगळेवेगळे दिसून येईल. कारण यामध्ये येणारे स्वीकृत नगरसेवक वेगवेगळ्या क्षेत्रातील असल्याने वेगवेगळ्या विषयांच्या माध्यमातून मनपामध्ये नवीन ऊर्जा निर्माण करण्याचे काम करतील.कारण त्यांचा अनुभव व अभ्यास शहराच्या विकासासाठी हातभार अवश्य लावेल. स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती सामाजिक पातळीवर केली तर राज्याचे नाव देशामध्ये सुवर्ण अक्षरात कोरले जाईल.यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी,सरकारनी व माननीय मुख्यमंत्री महोदयांनी एकमत करून ताबडतोब निर्णय घेतला पाहिजे. जेणेकरून सामाजिक कार्याला नवीन चालना मिळेल.जय हिंद.जय महाराष्ट्र.

**रमेश कृष्णराव लांजेवार,**
**६३ बी शिवनगर, नागपूर -९**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# धुक्याचं वातावरण असेल तर सीसीटीव्हीतील फुटेज स्पष्ट कसे? - सुषमा अंधारे

**मुंबई** - राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या अकाली निधनाने सर्वांनाच धक्का बसला आहे. बारामती येथे विमानाचे लँडींग होत असताना त्यांच्या विमानाचा अपघात झाला अन् अजित पवारांसह ५ जणांचा जागीच मृत्यू झाला. या धक्कादायक घटनेनंतर कार्यकर्त्यांच्याही भावना अनावर झाल्या असून अनेकजण या अपघाताची उच्चस्तरीय चौकशीची मागणी करत आहेत. त्यातच, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीही या अपघाताची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधींशांच्या अधिपत्याखाली चौकशी व्हावी, अशी मागणी केली आहे. आता, शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनीही काही प्रश्न उपस्थित करत, या अपघातानंतर राष्ट्रवादीतील प्रमुख तीन नेते मौन का बाळगून आहेत, असा सवाल उपस्थित केला आहे. बारामती विमानतळावर कमी दृश्यमानता होती म्हणून अपघात झाला असे अनेकजण अपघाताचे कारण सांगत आहेत. पण, खूप दूरच्या सीसीटीव्हीमध्ये विमान घिरट्या घालताना स्पष्ट दिसत होतं. जर तिथे धुक्याचं वातावरण असेल तर सीसीटीव्हीतील घरट्या घालतानाचे फुटेज इतके स्पष्ट कसे? असा सवाल सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला आहे. तसेच, काल लगेच यावर बोलणं संकेताला धरून नसलं तरी तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांनी उपस्थित केलेले प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत. ही चौकशी झालीच पाहिजे किंवा ही चौकशी आम्ही अगदी आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा करु असं सत्ताधाऱ्यांमधला एकही नेता ठामपणे का बोलत नाही? अजित दादांच्यानंतर पक्षातील जेष्ठता क्रम असणारे प्रफुल्ल पटेल, हसन मुश्रीफ किंवा दिलीप वळसे पाटील यांनी मौन का बाळगलं आहे? असा सवालही सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला आहे. साहेबांचे राष्ट्रवादीतलेही ज्येष्ठ नेते यावर का बोलत नाहीत? हे फक्त पवार कुटुंबाचे नुकसान नाही हे महाराष्ट्राचे नुकसान आहे, असेही सुषमा अंधारे यांनी म्हटले. दरम्यान, राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी संबंधित अपघाताच्या घटनेवर परखडपणे भाष्य करत, हा निव्वळ अपघात असून यामागे कुठलेही राजकारण आणू नये, असे म्हटले होते. तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विमान अपघाताच्या चौकशीची मागणी करण्यासंदर्भात नागरी उड्डाणमंत्र्यांना पत्रही दिलं आहे. मात्र, या घटनेवरुन प्रश्न उपस्थित केले जात आहेत. शिवसेना प्रवक्ते संजय राऊत यांनीही संबंधित घटनेचं सत्य जनतेसमोर यायलं हवं, त्यासाठी चौकशी व्हायलाच हवी अशी मागणी केली आहे. आता, सुषमा अंधारेंनीही संजय राऊतांची री ओढली असून राष्ट्रवादीच्या नेत्यांवरच निशाणा साधला आहे.

पान १ वरुन

## दिव्यांगाचे सक्षमीकरण...

प्रणालीचा आयडी, पासवर्ड वापरुन बोगस प्रमाणपत्र होत असल्या प्रकरणी आणि दिव्यांगासाठी प्रथम प्राधान्य देवून घरकुल देणे आदि विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

## लोकसहभागातून राजेवाडी ...

विद्यार्थ्यांना १९ हजाराची बक्षिसे प्रदान करण्यात आली.

प्रास्ताविकपर भाषणात मुख्याध्यापक जगत घुगे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाचे महत्त्व अधोरेखित केले. भारताच्या संविधानात मोठी ताकद असून या संविधानामुळेच आज सामान्य माणूस प्रगती करू शकत आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच समाजाला प्रबोधन करताना त्यांनी स्पष्ट केले की, भविष्यात बालविवाह रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे सांगितले. आपण तीन महिन्यापूर्वीच येथे रुजू झालेलो असून, शाळा आणि गावाच्या एकत्रित प्रयत्नातून प्रगतीकडे वाटचाल सुरू आहे. शाळेच्या विद्यार्थ्यांनी अनेक स्पर्धेत अव्वल क्रमांक पटकावलेला असून, त्यांना जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत संधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न राहणार आहेत. शासनाच्या कुष्ठरोग शोध मोहिमेला बळ देण्यासाठी गावात कुष्ठरोग निर्मूलनासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन त्यांनी दिले. विशेष म्हणजे, कुष्ठरुग्णांचा शोध घेऊन त्यांना उपचारासाठी प्रवाहात आणणाऱ्या व्यक्तींना वैयक्तिक स्वरूपात विशेष बक्षीस देऊन गौरविण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली.

स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. बालविवाह बालविवाह प्रतिबंधावर दर्जेदार नाटिका सादर करण्यात आली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याविष्काराने उपस्थित ग्रामस्थ मंत्रमुग्ध झाले. व्यासपीठावरील मान्यवरांनी शाळेच्या उपक्रमांचे कौतुक करत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक परमेश्वर मोरे यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार शिक्षिका वनिता आचार्य यांनी मानले. या कार्यक्रमाला शिक्षिका गंगा टेपले, प्रज्ञा चौधरी यांच्यासह सर्व शिक्षक, विद्यार्थी, राजेवाडीतील ग्रामस्थ, पालक आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकसहभागातून सुरू असलेल्या या शैक्षणिक क्रांतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## प्रजासत्ताक दिन संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ देशात सर्वोत्कृष्ट



**नवी दिल्ली । प्रतिनिधी -** देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीतील कर्तव्यपथावर पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे सादरीकरण सर्वोत्कृष्ट ठरले आहे. यंदाच्या संचलनामध्ये राज्यांच्या चित्ररथांमध्ये महाराष्ट्राच्या चित्ररथाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. केंद्र सरकारकडून या निकालांची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, या गटात जम्मू-काश्मीर आणि केरळ या राज्यांनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला आहे.

यंदा महाराष्ट्राने गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सादर केला होता. या चित्ररथाच्या माध्यमातून महाराष्ट्राची समृद्ध लोकसंस्कृती, गणेशोत्सवाचा सामाजिक वारसा आणि त्यातून मिळणारा आर्थिक रोजगार व आत्मनिर्भरतेचा संदेश अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आला होता. चित्ररथावरील भव्य गणेशमूर्ती, पारंपरिक ढोल-ताशा पथक आणि लेझीम खेळणाऱ्या कलाकारांच्या उत्साहाने कर्तव्यपथ दुमदुमून गेला होता. याच प्रभावी सादरीकरणामुळे परीक्षकांनी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या गटातून महाराष्ट्राच्या चित्ररथाला सर्वोत्तम चित्ररथ म्हणून निवडले आहे. केवळ राज्यांच्या श्रेणीतच नव्हे, तर इतर विभागांतही चुरस पाहायला मिळाली. यामध्ये सेना दलातून भारतीय नौदल तर निमलष्करी दलातून दिल्ली पोलीस यांच्या संचलन पथकाला सर्वोत्कृष्ट म्हणून गौरवण्यात आले. केंद्रीय मंत्रालयांच्या गटामध्ये सांस्कृतिक मंत्रालयाच्या चित्ररथाने बाजी मारली, तर केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वंदे मातरम् नृत्य समूहाला विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत विविध शाळेचे घवघवीत यश



**विशाल देशमुख टेंभूर्णी -** शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करून सेठ एकनाथ भगवानदास काबरा उर्दू माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी सबा रहेमान कुरेशी ही शिष्यवृत्ती धारक झाल्याबद्दल शाळेच्या वतीने सबा रहेमान कुरेशी हिचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापिका सुमैय्या रोशन शेख, पप्राथमिकचे मुख्याध्यापक शेख गयास, शिक्षक शेख साबेर, फकरू कुरेशी, शेख अबरार, शेख जुनेद यांची उपस्थिती होती.

कुष्ठरोग निवारण दिन

# भेदभाव समाप्त करु या, सन्मानाची वागणुक देऊ या

सन १८७३ मध्ये डॉ.हॅन्सन यांनी कुष्ठरोगाच्या जंतुचा शोध लावला. त्यामुळे कुष्ठरोगाला हॅन्सन डिसीज असे सुध्दा म्हणतात. कुष्ठरोग हा मायकोबॅक्टेरियम लेप्री या जिवाणु पासुन होतो. दरवर्षी ३० जानेवारीला कुष्ठरोग निवारण दिन साजरा करण्यांत येतो. या दिवशी महात्मा गांधी यांची पुण्यतिथी असते. महात्मा गांधी यांनी कुष्ठरुग्णांची सेवा करुन काळजी घेतली आहे. या आजारावर मात करण्यासाठी जागरुकता वाढविण्यात येऊन जनजागृती करण्यांत येते. जनतेमध्ये जनजागृती करुन समाजातील कुष्ठरोगाचे निर्मुलन करणे तसेच केंद्र शासनाने सन २०२७ पर्यंत कुष्ठरोग प्रसाराचे प्रमाण शुन्य करण्याचे हे उदिद्ष्ट आहे. कुष्ठरोगाचा प्रसार थांबविणे व कुष्ठबाधित रुग्णांना लवकरात लवकर बहुविध औषधोपचाराखाली आणणे तसेच कुष्ठरुग्णांच्या संपर्कातील नातेवाईकांना (निकट सहवासित) रिफॅम्पिसीन या गोळीचा एकल डोस देऊन संसर्गापासुन सुरक्षित करणे हे प्रमुख उदिद् ष्ट आहे.

घोषवाक्य : ' भेदभाव समाप्त करु या, सन्मानाची वागणुक देऊ या '

लक्षणे :- त्वचेवर लालसर फिकट न खाजणारा, न दुखणारा, बधीर चट्टा, तेलकट त्वचा, त्वचेवर गाठी, कानाच्या पाळया जाड होणे, त्वचेला थंड व गरम संवेदना न जाणवणे, हाता पायाची बोटे वाकडी, मज्जातंतु जाड होणे.

प्रसार :- कुष्ठबाधित रुग्णांच्या खोकला/शिंकाद्वारे मायकोबॅक्टेरियम लेप्री जिवाणु हवेमध्ये पसरतात. श्वसनप्रक्रिया मध्ये निरोगी व्यक्तीच्या शरीरामध्ये मायकोबॅक्टेरियम लेप्री जिवाणु प्रविष्ठ होतात. दुषित हवेद्वारे कुष्ठरोगाचा प्रसार होतो. कुष्ठरोग बाधित व्यक्ती सोबत जवळचा संपर्क असल्यास त्याचा प्रसार होतो. कुष्ठरोगाविरुध्द लढण्याच्या नैसर्गिक रोगप्रतिकार शक्तीमुळे बहुतांश लोकांना (९८ टक्के) कुष्ठरोग होत नाही. कुष्ठरोग कोणालाही होऊ शकतो.

अधिशयन काळ : ६ महिने ते १० वर्षे.

रोगनिदान :- बाहय शारीरिक तपासणी उदा. त्वचेवर लालसर फिकट न खाजणारा, न दुखणारा, बधीर चट्टा तपासणी, कानाच्या पाळया जाड, भुवयांचे केस विरळ, हाता पायाची बोटे वाकडी पाहणी, बायोप्सी,

प्रकार :- कुष्ठरोगाचे दोन प्रकार आहेत १) पी.बी.(पॉलीबॅसिलाय) व २) एम.बी.(मल्टीपल बॅसिलाय).

औषधोपचार :- सर्व शासकिय रुग्णालयात रोगनिदान व औषधोपचार मोफत उपलब्ध आहे. एम.डी.टी. औषधोपचार पध्दती आहे. पी.बी. केस मध्ये ०६ महिने औषधोपचार दिला जातो. यामध्ये टॅब.डापसोन, रिफामायसिन दिल्या जातात. पी.बी. केस असंसर्गजन्य आहे. एम.बी.केस मध्ये १२ महिने औषधी दिली जाते. यामध्ये टॅब.डापसोन, रिफामायसिन व क्लोफायझीमीन दिल्या जातात. एम.बी.केस संसर्गजन्य आहे. पी.बी. केस मध्ये १ ते ५ चट्टे व एम.बी.केसमध्ये असंख्य चट्टे असतात.

कुष्ठरोगामुळे अंधत्व, किडनीविकार, स्नायु कमकवुत, कायमचे हाताचे/पायाचे बोटे नष्ट होते, मज्जातंतुचे नुकसान होते, चेहरा विकृतीग्रस्त होतो.

गैरसमज :- कुष्ठरोग अनुवांशिक नाही. कुष्ठरोग हा शाप नसुन जिवाणुमुळे होणार रोग आहे.

सामाजिक घटक :- गरीबी, वैयक्तीक अस्वचछता, गर्दी.

प्रतिबंध :- बी.सी.जी. लस घेतल्यामुळे ५० टक्के कुष्ठरोगापासुन संरक्षण मिळते. आरोग्यदायक वातावरण ठेवणे, विटामीन अे,सी,डी,इ, बी-१२ व खनिज झिंक, मॅग्नेशियम व शिलेनियम चे प्रमाण व्यवस्थित ठेवणे. कुष्ठबाधित व्यक्तीचे लवकरात लवकर निदान करुन एम.डी.टी.औषधोपचाराखाली आणणे. एम.डी.टी.औषधोपचार प्रणालीमुळे कुष्ठरोग पुर्णपणे बरा होतो.


पुर्नेवसन :- कुष्ठरुग्णांचे वैद्यकिय, आर्थिक व सामाजिक पुर्नेवसन होणे आवश्यक आहे. शस्त्रक्रियेसाठी पात्र असलेल्या कुष्ठ रुग्णांवर जिल्हा सामान्य रुग्णालय व ठराविक स्वयंसेवी संस्थांमध्ये पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया मोफत करण्यांत येतात. मेजर शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांना रुपये १२०००/- इतका प्रोत्साहनपर भत्ता तसेच मेजर शस्त्रक्रिया करणा-या शासकिय आरोग्य संस्थांना रुपये ५०००/- इतका प्रोत्साहनपर भत्ता देण्यांत येतो. कुष्ठरुग्णांच्या पायाला नवीन जखम होऊ नये किंवा जखमा असलेल्या रुग्णांना वर्षातुन दोन वेळा मोफत एम.सी.आर. चप्पल देण्यांत येते. कुष्ठरुग्णांना हाताची बोटे वाकडी असतील तर रुग्णांना मोफत स्प्लिंटस. पात्र कुष्ठरुग्णांना



सर्व शासकिय रुग्णालये व स्वयंभु कुष्ठ वसाहतीमध्ये गरजेप्रमाणे मोफत व्रणोपचार सेवा व भौतिकोपचार सेवा देण्यांत येतात. कुष्ठरुग्णाला शासन मार्फत विविध सुविधा देण्यांत येतात. उदा.एस.टी.बस मध्ये प्रवास सवलत, कुष्ठमुळे अंपगत्व असल्यास अंपगाचे प्रमाणपत्र. अधिक माहितीसाठी आपल्या जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधा. आकडेवारी: माहे एप्रिल २०२५ ते डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत एकूण १४३ नवीन कुष्ठरुगण आढळून आले असून त्यांना बहुविध औषध सुरू करण्यात आले आहेत तसेच कुष्ठरोगोनांच्या संपर्कातील नातेवाईकांना (सहवासीतांना) रिफामायसिन या गोळीचा एक डोस देऊन संसर्गापासून सुरक्षित करण्यात आले आहे.

**डॉ. जयश्री भुसारे**
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना.

## राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा जालना जिल्हा दौरा कार्यक्रम



**जालना । प्रतिनिधी -** राजस्थान राज्याचे राज्यपाल हरिभाऊ बागडे हे रविवार दि.१ फेब्रुवारी २०२६ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

रविवार दि.१ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथून सकाळी १०.४५ वाजता जेईएस महाविद्यालय, जालना येथे आगमन व राखीव. सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे आयोजित केलेल्या कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १.३० वाजता जालना येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.




# अर्थशास्त्र विभागातर्फे राष्ट्रीय शेतकरी दिन निमित्त भितीपत्रकाचे प्रकाशन

**परभणी । प्रतिनिधी -** कै .सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागातर्फे २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त देशाचे पाचवे पंतप्रधान आणि शेतकऱ्यांची कठोर ,मेहनत, संघर्ष आणि समर्पणाची आठवण करून देणारे शेतकऱ्यांचे मसीहा ज्यांनी आपल्या कार्यकाळात जमीन सुधारणा, नाबार्ड ची स्थापना आणि कृषी उत्पन्न बाजार विधेयकाद्वारे शेतकऱ्यांच्या हितासाठी मोठे काम केले असे ''चरण सिंह चौधरी ''यांचा जन्मदिवस ''राष्ट्रीय शेतकरी दिन ''म्हणून साजरा केला जातो .त्या निमित्ताने भित्तिपत्रक तयार करून प्रकाशित केले आहे .
राष्ट्रीय शेतकरी दिनाचे महत्त्व या विषयावर अर्थशास्त्र विभागाचा प्रमुख डॉ. सी .व्ही .पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार बी .ए .प्रथम वर्षाच्या रूपाली जाधव ,ऋतुजा देशमुख ,अंजली बालटकर ,किरण निकाळजे ,सावित्री कांबळे या विद्यार्थिनींनी हस्तलिखित



तयार केलेल्या भितीपत्रकाचे विमोचन संस्थेचे अध्यक्ष मा. श्री .हेमंतराव जामकर साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी उपस्थित मान्यवर डॉ. अभयजी सुभेदार, मा.डॉ.संजयजी टाकळकर, मा. अँड. श्री .मंगेश राव सुभेदार मा. श्री .हर्षल सुभेदार मा. डॉ.समीर संजयराव टाकळकर, प्राचार्य डॉ.रामचंद्र भिसे व अर्थशास्त्र विभागातील डॉ. सी . व्ही .पाटील , डॉ.व्हि. के .शेळके.व सर्व प्राध्यापक वृंद,तसेच प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थिनी या सर्वांच्या उपस्थितीत झाला.

---

अखिल भारतीय माध्यमिक शिक्षक संघाच्या राष्ट्रीय कार्यकारणीवर प्रतिनिधित्व करण्याची मराठवाडा शिक्षक संघास संधी

# शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांची सहसचिवपदी निवड

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** मराठवाडा शिक्षक संघाचे अभ्यासू व लढाऊ सरचिटणीस राजकुमार कदम यांची अखिल भारतीय माध्यमिक शिक्षक संघ () च्या राष्ट्रीय सहसचिव पदी निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल त्यांचे राज्यातील शिक्षण क्षेत्रातील मंडळी कडून अभिनंदन करण्यात येत आहे.



याबाबत मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिलेली माहिती अशी की,अखिल भारतीय माध्यमिक शिक्षक संघाच्या राष्ट्रीय कार्यकारणीची बैठक नुकतीच राजेस्थान येथील जयपूर शहरात पार पडली. या बैठकीत महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रात कार्यरत आसलेल्या मराठवाडा शिक्षक संघाला राष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व देण्याचा निर्णय घेण्यात आला व अखिल भारतीय माध्यमिक शिक्षक संघाच्या सहसचिव पदी मराठवाडा शिक्षक संघाचे अभ्यासू ,लढाऊ व झुंझार असे सरचिटणीस राजकुमार कदम यांची निवड सर्वानुमते करण्यात आली.सदरील निवड हि अखिल भारतीय माध्यमिक शिक्षक संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.इंद्रशेखर मिश्राजी (बिहार),कार्यकारी अध्यक्ष माजी शिक्षक आमदार नरसिम्हा रेड्डी(आंध्रप्रदेश), राष्ट्रीय सचिव सदानंद गौड (तेलंगणा) यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत करण्यात आली.

यानिवडीमुळे आपल्या राज्यातील शिक्षकांचे व शिक्षण क्षेत्रातील केंद्रीय पातळीवरील प्रश्न केंद्रीय स्तरावर मांडण्यासाठी व मार्गी लावण्यासाठी राजकुमार कदम सर यांचासारखा खंदा प्रतिनिधी आपल्याला मिळाला आहे. त्याबद्दल अखिल भारतीय माध्यमिक शिक्षक संघाचे व राजकुमार कदम यांचे मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक मा.श्री.पी.एस. घाडगे, व्ही.जी.पवार, अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, गुट्टे एस.जी., कोषाध्यक्ष औताडे ए.बी., सहसचिव पवार टी.जी., माळी एन.जी., श्रीमती रेखा सोळुंके, केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव, अशोक मस्कले, मधुकर जोंधळे, रातोळे जी.जी., कुरेशी ए.ए.,राठोड पी.आर., सुर्यवंशी आर.एन., कदम व्ही.जी., कौशल्य जी.पी., पाटोदेकर ए.डी., सोळंके एन.टी., वऱ्हाड बी.ए., तिर्थकर एस.एस.जमादार एफ.बी. पाटील पी.एस. यांच्यासह जिल्हाध्यक्ष कालीदास धपाटे, व्यंकटराव चिलवरवार, बसवेश्वर माने, शेरखाने जे.एस.,रमेश आंधळे, यशवंत मकरंद, हरिभाऊ भडके, हाळदे के.एम., जिल्हासचिव गणेश आजबे, रविंद्र वाकोडे, भाई चंद्रकांत चव्हाण, माने जी.व्ही.,विक्रम मायाचारी, रमेश आंधळे, संजय येळवंते, ज्ञानोबा वरवट्टे, जगन वाघमोडे, गणेश मेहत्रे, काकड सर, कदम एन.टी.,ढेंगळे व्ही.एस.,दिनेश पाटील व बीडचे माजी जिल्हाध्यक्ष/मार्गदर्शक डी.जी.तांदळे यांनी अभिनंदन केले आहे.

---

जालना शहराचा कायमचा पाणी प्रश्न सोडविणारे लोकनेते हरपले

# भीषण दुष्काळात अजितदादांनी जालन्यास दिलासा दिला - तय्यबबापु देशमुख

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्राच्या राजकारणातील कर्तबगार, दूरदृष्टी असलेले आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी झटणारे लोकनेते माजी उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांनी जालना शहराचा कायमचा पाणी प्रश्न सोडवून शहरवासीयांना मोठा दिलासा दिला होता, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) जालना शहर उपाध्यक्ष तय्यब बापु देशमुख यांनी केले.
देशमुख यांनी सांगितले की, २०१०-११ साली जालना जिल्ह्यात भीषण दुष्काळ पडला होता. घानेवाडी तलाव पूर्णपणे कोरडा झाला होता. जालना शहरात दोन ते तीन महिने नळाला पाणी आले नव्हते. शहरातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत होते. ही परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्राने पाहिली होती.
या गंभीर परिस्थितीत मी स्वतः मा. ना. अजितदादा पवार साहेबांना निवेदन दिले. त्यांनी या प्रश्नाची तात्काळ दखल घेतली. कोणतीही दिरंगाई न करता लगेच निधी उपलब्ध करून दिला आणि अधिकाऱ्यांना स्पष्ट आदेश



देऊन जालना शहराचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी ठोस उपाययोजना राबविल्या. त्यांच्या तत्पर निर्णयामुळे जालना शहराला मोठा दिलासा मिळाला आणि पुढील काळात पाणीपुरवठा सुरळीत झाला.

**सर्वसमावेशक विकासाची दृष्टी**

तय्यब बापु देशमुख म्हणाले की, अजितदादा पवार हे महाराष्ट्राचा विकास करणारे, आठरा पगडी जाती-जमातींना सोबत घेऊन सर्वांना न्याय देणारे लोकनेते होते. ग्रामीण विकास, जलसंपदा, सिंचन, पाणीपुरवठा, शेती, उद्योग अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी भरीव काम केले. ''आज असा नेता पुन्हा होणे कठीण आहे. अजितदादांचा आवाज थांबल्यामुळे महाराष्ट्राचा विकासही जणू थांबला आहे,'' अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. ''अजितदादा परत या'' देशमुख यांनी भावनिक शब्दांत सांगितले की, ''अजितदादा परत या अजितदादा परत या अजितदादा परत या महाराष्ट्राला तुमची गरज आहे.'' त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राने एक कर्तबगार, निर्भीड आणि सर्वसामान्यांचा आवाज गमावला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) जालना शहराच्या वतीने मा. ना. अजितदादा पवार साहेबांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.
ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो, तसेच त्यांच्या कुटुंबीयांना व समर्थकांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, अशी प्रार्थनाही यावेळी करण्यात आली.

---

# खतवड ग्रामपंचायतीचा भावनिक व प्रेरणादायी निर्णय

## प्रजासत्ताक दिनी ग्रामसेविकेच्या हस्ते ध्वजारोहण

**दिंडोरी । प्रतिनिधी**
- स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर उभा असलेला प्रजासत्ताक दिन केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता समाजमनाला स्पर्श करणारा उत्सव ठरावा, याचे जिवंत उदाहरण यंदा दिंडोरी तालुक्यातील खतवड ग्रामपंचायतीने साकारले.
सामान्यतः राष्ट्रीय सणांच्या दिवशी ध्वजारोहणाचा मान राजकीय नेते किंवा गावातील प्रतिष्ठित नागरिकांना दिला जातो. मात्र खतवड ग्रामपंचायतीने या रूढ परंपरेपलीकडे जात, गावाच्या विकासासाठी शांतपणे, निष्ठेने व निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या ग्रामसेविका श्रीमती आर. एच. काथेपुरी यांच्या हस्ते ग्रामपंचायत कार्यालयावर ध्वजारोहण करून एक सकारात्मक संदेश दिला.
त्याचप्रमाणे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिनाचे ध्वजारोहण शासकीय लेखापाल पदी नुकतीच निवड झालेल्या आणि शाळेच्या माजी विद्यार्थिनी कुमारी श्वेता अशोक खुर्दळ यांच्या हस्ते पार पडले.तर ध्वजपुजन कुस्तीपटू सुवर्णपदक विजेता मानव विलास मुळाणे यांच्या हस्ते करण्यात आले.
दोन महिलांच्या हस्ते ध्वजारोहण होणे ही बाब अनेकांसाठी अभिमानास्पद व प्रेरणादायी ठरली.
गावाच्या प्रत्येक प्रश्नात, प्रत्येक योजनेत आणि प्रत्येक गरजेच्या क्षणी प्रशासनाची जबाबदारी समर्थपणे पार पाडणाऱ्या ग्रामसेविकेला मिळालेला हा सन्मान केवळ व्यक्तीपुरता मर्यादित नव्हता,




तर तो कर्तव्यनिष्ठ प्रशासकीय सेवेचा गौरव होता. या क्षणी अनेक ग्रामस्थांच्या डोळ्यांत नकळत समाधान आणि अभिमानाचे भाव उमटले.
जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे विद्यार्थीनी राष्ट्रगीताच्या सुरात संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला होता.
या कार्यक्रमास सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील,वि. का.सहकारी संस्था चेअरमन,विविध समितीचे पदाधिकारी
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुख्यध्यापिकासह शिक्षक वृंद, महिला-पुरुष, युवक-युवती तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
प्रशासनातील कर्मचारी हा लोकशाहीचे खरे आधारस्तंभ असून त्यांचा सन्मान हाच खरा प्रजासत्ताक दिन असल्याची भावना व्यक्त केली. राजकारणाच्या चौकटीपलीकडे जाऊन कर्तव्य, प्रामाणिकपणा आणि सेवाभावाला सन्मान देण्याची ही भूमिका केवळ खतवडपुरती मर्यादित न राहता संपूर्ण समाजासाठी दिशादर्शक ठरावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली. समतेचा, कर्तव्याचा आणि माणुसकीचा अर्थ प्रत्यक्ष कृतीतून दाखवणारा हा प्रजासत्ताक दिन खतवडकरांच्या कायम स्मरणात राहणारा ठरला.

**झाडे लावा**

**झाडे जगवा**

---

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर शोकाकुल वातावरणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

**पुणे -** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शोकाकुल वातावरणात शासकीय इतमामात अखेरचा निरोप देण्यात आला. बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या परिसरात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुष्पचक्र अर्पण करून अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली.
यावेळी विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, प्रताप जाधव, रक्षा खडसे, मुरलीधर मोहोळ, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, आंध्र प्रदेशचे शिक्षण मंत्री नारा लोकेश, खासदार निरज चंद्रशेखर, वन मंत्री गणेश नाईक, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, आदिवासी



विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक वुईके, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ तसेच नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, कामगार मंत्री आकाश फुंडकर उपस्थित होते.
प्रशासनाच्या वतीने राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी राज्यभरातील खासदार, आमदार, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांसह सर्वसामान्य नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप दिला. अंत्यसंस्कारापूर्वी दिवंगत अजित पवार यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी विद्या प्रतिष्ठान परिसरात पहाटेपासूनच जनसागर उसळला होता. सामान्य नागरिक, शेतकरी, युवक, महिला तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी यांनी उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.

---

# जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीचे आयोजन

**जालना -** जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीचे शुक्रवार, दि. ३० जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला समितीवर नियुक्त शासकीय सदस्य, अशासकीय सदस्यांनी वेळेवर उपस्थित रहावे. तसेच सर्वसामान्य नागरिकांचे ग्राहक हितासंबंधीत तक्रार असल्यास सदर बैठकीच्या दिवशी उपस्थित राहून आपला लेखी स्वरुपाचा अर्ज सादर करावा.
नागरिकांना ग्राहक या संबंधाने काही अडचणी असल्यास त्याबाबत जालना जिल्ह्याचे संकेतस्थळ .. यावर ग्राहकांच्या तक्रारीसाठी पोर्टल उपलब्ध करुन दिलेले असून, नागरिकांनी त्यांच्या समस्या या पोर्टलच्या माध्यमातून सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी तथा जालना संरक्षण परिषदेचे सदस्य सचिव सविता चौधर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

---

# महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा क्रीडा विभागाकडून सौ. करुणा मोरे यांचा जिल्हा युवा पुरस्काराने गौरव

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवा धोरणानुसार जिल्ह्यातील युवकांनी समाजहितासाठी पार पाडलेल्या भूमिकेचा आणि दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यासाठी जिल्हा युवा पुरस्कार देण्यात येतो. सन २०२४-२५ चा जिल्हा युवा पुरस्कार (युवती) म्हणून सामाजिक व युवा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल करुणा अच्युत मोरे यांना प्रदान करण्यात आला. सोमवार दि. २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता राज्याच्या पर्यावरण मंत्री तथा पालकमंत्री यांच्या हस्ते हा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.
स्मृतीचिन्ह, मानपत्र, १० हजार रुपयाचा धनादेश असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी माजी पालकमंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर, माजी राज्यमंत्री



तथा आमदार अर्जुनराव खोतकर, आमदार नारायण कुचे, आमदार राजेश राठोड, माजी आमदार कैलास गोरंट्याल, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधिक्षक अजय कुमार बंसल, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उप जिल्हाधिकारी शशिकांत हदगल, क्रीडा अधिकारी श्रीमती लोंढे, आरती चिल्लारे आदींची उपस्थिती होती.
सामाजिक क्षेत्रात केलेल्या योगदानाची शासनाने दखल घेत पुरस्कार प्रदान केल्याने सामाजिक कार्यकर्ते अरविंद देशमुख, रमेश देहेडकर, सौ. रसना देहेडकर, बालाजी बळप, अंकुश काळे, रामकृष्ण हिवाळे, अच्युत मोरे, किरण साळवे यांच्यासह अनेकांनी अभिनंतर केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.